# मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (वर्तणूक) विनियम, १९७६

# मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (वर्तणूक) विनियम, १९७६

## अनुक्रमणिका


| विनियम क्र. | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, प्रारंभ व प्रयुक्ती | |
| २. | व्याख्या | |
| ३. | सर्वसाधारण | |
| ४. | राजकारण व निवडणुका यांमध्ये सहभागी होणे | |
| ५. | वृत्तपत्रे किंवा आकाशवाणी यांच्याशी संबंध | |
| ६. | मंडळ/शासन यांच्यावर टीका | |
| ७. | समितीपुढे किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणापुढे साक्ष देणे. | |
| ८. | अनधिकृतपणे माहिती देणे. | |
| ९. | अभिदान | |
| १०. | देणगी | |
| ११. | कर्मचा-याच्या सन्मानार्थ सार्वजनिक समारंभ | |
| १२. | खाजगी व्यापार किंवा नोकरी | |
| १३. | गुंतवणुका, उसने देणे आणि उसने घेणे | |
| १४. | नादारी व नित्याचा कर्जबाजारीपणा | |
| १५. | स्थावर, जंगम व मौल्यवान मालमत्ता | |
| १६. | कर्मचा-याच्या कृतीचे व चारित्र्याचे प्रतिसमर्थन | |
| १७. | अशासकीय किंवा इतर बाह्य प्रभावांचा प्रचार करणे | |
| १८. | विवाहासंबंधी निर्बंध | |
| १८अ. | कर्मचा-यानी छोटया कुटुंबांचा अंगीकार करणे | |
| १९. | मद्यपान | |
| २०. | अर्थउकल | |
| | जोडपत्र 'अ' | |
| | जोडपत्र 'ब' | |
| | जोडपत्र 'क' | |

# मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (वर्तणूक) विनियम, १९७६

जी.एस.आर.८७७- प्रमुख बंदर विश्वस्त अधिनियम-१९६३ (१९६३ चा ३८) याच्या कलम १२६, तसेच कलम २८च्या व्दारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, केंद्र सरकार, पुढीलप्रमाणे प्रथम विनियम करत आहे:

## १. संक्षिप्त नाव, प्रारंभ व प्रयुक्ती:

**(१)** या विनियमांना मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (वर्तणूक) विनियम, १९७६ असे म्हणता येईल.

**(२)** ते, [१]शासकीय राजपत्रात प्रसिध्द करण्यात येतील त्या दिनांकानंतर अंमलात येतील.[१]

**(३)** या विनियमाव्दारे किंवा अन्वये अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीज करून ते मुंबई पोर्ट ट्रस्टच्या कामकाजाशी संबंधित पदावर नियुक्त करण्यात आलेल्या सर्व व्यक्तींना लागू होतील.

परंतु, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४) च्या तरतुदींच्या अधीन राहून विनियम ४ याच्या उप-विनियम (५) चा खंड (दोन) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, विनियम ९ विनियम १० चा उप विनियम (२), विनियम ११, विनियम १२चा उप-विनियम (२), विनियम १३, विनियम १५ चे उप-विनियम (१), (२) आणि (३), विनियम १६, १७ व १८ हे आणि दरमहा रुपये ६५० पेक्षा जास्त नसलेले वेतन घेणा-या आणि वर्ग तीन किंवा वर्ग चार ची पदे धारण करणा-या कर्मचा-यांना लागू होतील.

परंतु आणखी असे की, पूर्वगामी तरतुदीमध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट मुख्यत्वेकरून प्रशासकीय, व्यवस्थापकीय, पर्यवेक्षकीय, सुरक्षा किंवा कल्याण कार्य यांच्याशी संबंधित असलेले पद धारण करणा-या कोणत्याही कर्मचा-यास लागू होणार नाही.

## २. व्याख्या:-

या विनियमात संदर्भानुसार अन्यथा अर्थ आवश्यक नसेल तर,-

**(क)** "मंडळ", "अध्यक्ष", "उपाध्यक्ष", आणि "विभागप्रमुख" यांना प्रमुख पोर्ट ट्रस्ट अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३८) यात जो अर्थ असेल, तोच अर्थ असेल;

---

१. भारताचे राजपत्र, भाग दोन मध्ये प्रसिध्द झालेली एमओएसटी अधिसूचना क्रमांक पीईबी (६)/७५, दिनांक २६.५.१९७६. कलम ३, पोट कलम (एक) दि.१९ जून १९७६. (१९.६.१९७६ पासून लागू).

**(ख)** "वर्ग एक ,वर्ग दोन, वर्ग तीन आणि वर्ग चार ची पदे" यांना मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (वर्गीकरण,नियंत्रण व अपील) विनियम,१९७६ यात अनुक्रमे जो अर्थ नेमून देण्यात आला आहे तोच अर्थ असेल;

**(ग)** "कर्मचारी" याचा अर्थ मंडळाचे कर्मचारी असा आहे.

**(घ)** "शासन" याचा अर्थ केंद्र शासन असा आहे.

**(ङ)** कर्मचा-याच्या संबंधात "कुटुंबांचे सदस्य" यामध्ये - पुढील व्यक्तींचा समावेश येतो -

(एक) अशा कर्मचा-याची पत्नी, मुले किंवा सावत्र मुले मग ती त्याच्याबरोबर राहत असोत वा नसोत, आणि महिला कर्मचारी असेल तर, अशा कर्मचा-याच्या बाबतीत, जी महिला आहे तिच्याबरोबर राहत असलेला आणि तिच्यावर अवलंबून असलेला तिचा पती; आणि

(दोन) रक्ताच्या नात्याने किंवा लग्नामुळे असो - नाते असणारी इतर कोणतीही व्यक्ति, किंवा अशा कर्मचा-यावर संपूर्णतया अवलंबून असणारी अशा कर्मचा-याची पत्नी किंवा पती. परंतु त्यात अशा कर्मचा-यापासून कायदयाने विभक्त झालेली पत्नी किंवा पती यांचा, किंवा त्यांच्यावर कोणत्याही प्रकारे कोणत्याही त-हेने अवलंबून नसेल किंवा कायदयाच्या प्रक्रियेमुळे कर्मचारी ज्याच्या अभिरक्षेस मुकला असेल असे मूल किंवा सावत्र मूल, याचा सामावेश होत नाही;

**(च)** "विहित प्राधिकारी" याचा अर्थ मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (वर्गीकरण,नियंत्रण व अपील) विनियम, १९७६, यामध्ये विहित करण्यात आलेला नियुक्ती प्राधिकारी, असा आहे.

**3. <u>सर्वसाधारण:-</u>** प्रत्येक कर्मचा-याने, नेहमीच निरपवाद सचोटीने वागले पाहिजे व कर्तव्यपरायण असले पाहिजे.

**(१क)** कोणताही कर्मचारी-

(एक) बंदराच्या हितास बाधक होईल अशा रीतीने काम करणार नाही;

(दोन) रजा मंजूर केल्याशिवाय अनुपस्थित राहणार नाही किंवा उपस्थितीमध्ये अनियमितपणा किंवा गैरवक्तशीरपणा ठेवणार नाही;

(तीन) काम पार पाडताना कामात दुर्लक्ष करणार नाही किंवा कामाचे बल प्रदर्शन करणार नाही.

(चार) पोर्ट ट्रस्टच्या कामाच्या किंवा मालमत्तेच्या संबंधात अपप्रेरणा देणार नाही, काणाडोळा करणार नाही किंवा चोरी किंवा चोरीचा प्रयत्न करणार नाही, लबाडी किंवा अप्रामाणिकपणा करणार नाही;

(पाच) ज्याकरिता दंड लादण्यात येऊ शकेल अशी वारंवार पुनरावृत्ती किंवा कोणतीही कृती किंवा अकृती करणार नाही;

(सहा) वरिष्ठांच्या एकाद्या विधिसंमत किंवा वाजवी आदेशाची अनुज्ञा करण्याचे कृत्य, मग तो एकटयाने असो किंवा इतरांबरोबर असो करणार नाही किंवा शिरजोरी करणार नाही;

(सात) जी गैरवर्तणुकमध्ये जमा होऊ शकते अशी अपप्रेरणा देणार नाही किंवा अपप्रेरणा देण्याचा प्रयत्न करणार नाही;

(आठ) पोर्ट ट्रस्टच्या मालमत्तेची किंवा पोर्ट ट्रस्टच्या ताब्यात किंवा जागेत येणा-या मालमत्तेची हानी किंवा नुकसान करणार नाही, किंवा पोर्ट ट्रस्टच्या जागेत उभारण्यात आलेल्या कोणत्याही सुरक्षेच्या साधनात हस्तक्षेप करणार नाही;

(नऊ) एखाद्या अवैध पारितोषणाकरिता लाच देणार किंवा घेणार नाही किंवा त्यासंबंधात प्रोत्साहन देणारे कोणतेही कृत्य करणार नाही;

(दहा) पोर्ट ट्रस्टच्या वरिष्ठ अधिका-यावर किंवा अधिका-यांवर किंवा समान्य कर्मचारी किंवा कर्मचा-यांवर हल्ला करणार नाही किंवा त्यांना धाकदपटशा दाखवणार नाही;

(अकरा) पोर्ट ट्रस्टच्या जागेत जुगार किंवा पैज खेळणार नाही किंवा तसे करण्याचा प्रयत्न करणार नाही;

(बारा) नियमांचे किंवा विनियमांचे अनुपालन करण्यात कसूर करणार नाही;

(तेरा) चुकीची किंवा दिशाभूल करणारी विधाने करणार नाही;

(चौदा) अध्यक्षांची पूर्वमंजुरी घेतल्याशिवाय, पोर्ट ट्रस्टच्या जागेत घडलेल्या किंवा पोर्ट ट्रस्टच्या कामकाजासंबंधात घडलेल्या किंवा पोलिसांकडून अदखलपात्र असेल अशा कोणत्याही विवादासंबंधात किंवा अशा अपराधासंबंधात कोणत्याही सहका-या विरूध्द कोणत्याही न्यायालयात कार्यवाही सुरुकरणार नाही; आणि

(पंधरा) कामावर असताना भांडण करणे किंवा झोपणे यासारखे अनुचित वर्तन करणार नाही किंवा दंगेखोर, गैरशिस्त किंवा असभ्य रीतीने वर्तन करणार नाही किंवा शिस्तीस विघातक ठरेल असे कोणतेही कृत्य करणार नाही.

[१][(२) वर्ग एक किंवा वर्ग दोनचे पद धारण करणारा कोणताही कर्मचारी, कोणत्याही कंपनीत किंवा भागीदारी संस्थेत, त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यास नोकरी मिळवून देण्यासाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे, त्याच्या पदाचा किंवा वशिल्याचा वापर करणार नाही.]

[२][(३) (एक) वर्ग एकचे पद धारण करणारा कोणताही कर्मचारी, अध्यक्षांच्या पूर्व मंजुरी शिवाय, त्याच्या मुलास, मुलीस किंवा त्याच्यावर अवलंबून असणा-या इतर कोणत्याही व्यक्तीस त्याच्या अधिकारात मंडळाशी कार्यालयीन व्यवहार करणा-या कोणत्याही कंपनीत किंवा भागीदारी संस्थेत नोकरी स्वीकारण्यास परवानगी देणार नाही:

परंतु, अशा कर्मचा-याच्या मुलास, मुलीस किंवा अवलंबून असणा-या इतर व्यक्तीस, जेव्हा अशी नोकरी स्वीकारताना, अध्यक्षांच्या पूर्वपरवानगी करिता वाट पहाणे शक्य नसेल किंवा अन्यथा ती नोकरी स्वीकारणे तातडीचे मानले जाईल तेव्हा, कर्मचा-याकडून ती बाब अध्यक्षांना कळविण्यात येईल आणि अध्यक्षांच्या परवानगीच्या अधीन राहून ती नोकरी तात्पुरती स्वीकारता येईल.]

[३][(दोन) वर्ग एक किंवा वर्ग दोनचे पद धारण करणा-या कर्मचा-यास जेव्हा ही वस्तुस्थिती ज्ञात होईल की, त्याच्या कुटुंबातल्या सदस्याने कोणत्याही कंपनीत किंवा भागीदारी संस्थेत ही नोकरी स्वीकारली आहे, तेव्हा त्याने नोकरी स्वीकारल्याबद्दल अध्यक्षांना कळविले पाहिजे आणि त्याचे त्या कंपनीशी किंवा भागीदारी संस्थेशी कोणते कार्यालयीन व्यवहार चालतात किंवा कसे हे ही कळविले पाहिजे

परंतु, वर्ग एकचे पद धारण करणा-या कर्मचा-याच्या बाबतीत जर खंड (एक) अन्वये अध्यक्षांची परवानगी अगोदरच घेतली असेल किंवा तसे आधीच कळविले असेल तर, असे पुन्हा कळविण्याची आवश्यकता नाही ]

---

१. टीआर क्रमांक ४0८ दि.१४.१२.१९७६ व्दारे आणि एमओएसटी पत्र क्र.पीईबी-१0४/७६ दि. ७.३.१९७७ व्दारे समाविष्ट करण्यात आले (१९.५.१९७७ पासून)

२. २६.४.१९७७ चा टीआर क्र. १४४ व्दारे आणि एमओएसटी पत्र क्र.पीईबी-३६/७७ दि. १८.७.१९७७ व्दारे नवीन क्रमांक देण्यात आले.

३. २६.४.१९७७ चा टीआर क्र. १४४ व्दारे आणि एमओएसटी पत्र क्र.पीईबी-३६/७७ दि. १८.७.१९७७ व्दारे समाविष्ट करण्यात आले.(३.११.१९७७ पासून)

[१].(४) प्रत्येक कर्मचा-यास, त्याचा मुलगा किंवा त्याच्यावर अवलंबून असलेली व्यक्ती, ज्या कोणत्याही भागीदारी संस्थेत किंवा कंपनीत नोकरी करत असेल, त्याच्या वतीने देण्यात येणारे कंत्राट किंवा करण्यात येणारी नेमणूक, अशा प्रकरणासंबंधित व्यवहार करण्यापासून परावृत करण्यात येईल.

[१](५) कोणताही कर्मचारी मंडळातर्फे किंवा मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या कोणत्याही लिलावात बोली लावणार नाही.

[१](६) कोणत्याही कर्मचा-याने, धर्मांतर विषयक कार्यक्रमात सहभागी होणे किंवा अशा कोणत्याही कार्यक्रमात त्याच्या पदाचा आणि वशिल्याचा, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष वापर करणे, हे आक्षेपार्ह असेल.

[१](७) प्रत्येक कर्मचा-याने त्याच्या खाजगी आयुष्यात एक वाजवी व सभ्य असा दर्जा राखणे अपेक्षित आहे आणि त्याच्याकडून होण-या कोणत्याही दुर्वर्तनामुळे त्याच्या मालकाची अपकीर्ती होऊ देता कामा नये. मंडळाच्या कर्मचारीवर्गास अशोभनीय रीतीने त्याने वर्तणूक केली आहे असे त्या प्रसंगासाठी [२] [त्याचा जीवनसाथी व कुटुंब यांच्याकडे दुर्लक्ष करून]; त्या कारणावरून, त्याच्याविरुध्द, कार्यवाही करण्यात येईल.

[१](८) कर्मचारी, ज्यास न्यायालयाने सिध्ददोषी मानले आहे किंवा अटक केली आहे तो, त्याच्या दोषसिध्दीबाबतची किंवा अटकेबाबतची वस्तुस्थिती, त्याच्या विभागीय वरिष्ठांना तात्काळ, लेखी कळवील. तसे करण्यात कसूर केल्यास, त्याच्यावरील शिस्तभंगाच्या कारवाईसाठी तो पात्र होईल.

## ४. निवडणुकीत भाग घेणे:

(१) कोणताही कर्मचारी कोणत्याही विधानमंडळाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणुकीत भाग घेणार नाही.

परंतु-

(एक) अशा निवडणुकीत मत देण्यास पात्र असेल अशा कर्मचा-यास आपल्या या मतदानाच्या हक्काचा वापर करता येईल परंतु जेव्हा तो उक्त हक्काचा वापर करील तेंव्हा तो कोणत्या त-हेने मतदान करणार आहे किंवा त्याने मतदान केले आहे याबद्दल कोणताही निर्देश करणार नाही.

(दोन) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याव्दारे किंवा कायद्यान्वये त्याच्यावर लादलेल्या कर्तव्याच्या यथोचित पालनात निवडणुकीच्या कामकाजात सहाय्य करील त्याबाबतीत, याच केवळ कारणावरून कर्मचा-याने या विनियमांच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे, असे मानण्यात येणार नाही.

---

१ १४.१२.१९७६ च्या टी.आर. क्र.४०८ द्वारे आणि एमओएसटी पत्र क्र. पीईबी-१०४/७६दि.७.३.१९७७ द्वारे समाविष्ट करण्यात आले. (१९.५.१९७७ पासून)

२ १०.६.१९८० चा टी.आर क्र.१४० द्वारे आणि एमओएसटी अधिसूचना क्र.पीडब्ल्यू/पीईबी-५८/८० दि.१०.९.१९८० द्वारे समाविष्ट करण्यात आले. (२७.९.१९८० पासून)

२. कोणताही कर्मचारी, भारताचे सार्वभौमत्वाच्या किंवा एकात्मतेच्या हिताच्या दृष्टीने, राज्याच्या सुरक्षिततेला, परकीय राज्याशी असलेल्या मित्रत्वाच्या संबंधाला, सार्वजनिक सुव्यवस्थेला, सभ्यतेला किंवा नीतिमत्तेला बाधक ठरेल, किंवा ज्यामध्ये न्यायालयाच्या अवमानाचा किंवा बदनामीचा समावेश होईल किंवा ज्यामुळे अपराध करण्यास चिथावणी मिळेल असे कोणतेही निदर्शन करणार नाही किंवा त्यात भाग घेणार नाही.

३. कोणताही कर्मचारी, ज्या संघटनेची उद्दिष्टे किंवा कार्य भारताच्या सार्वभौमत्वाच्या आणि एकात्मतेच्या हितास किंवा सुव्यवस्थेला किंवा नैतिक मूल्यांना बाधक असतात अशा संघटनेत सहभागी होणार नाही किंवा त्याचा सदस्य राहणार नाही.

## ५. <u>वृत्तपत्रे किंवा आकाशवाणी यांच्याशी संबंध:</u>

(१) कोणताही कर्मचारी, अध्यक्षांच्या पूर्व मंजुरीखेरीज कोणतेही वृत्तपत्र किंवा इतर नियतकालिक, पूर्णत: किंवा अंशत: मालकीचे ठेवणार नाही किंवा ते चालविणार नाही किंवा त्यांचे संपादन किंवा व्यवस्थापन करण्यात सहभागी होणार नाही.

(२) कोणताही शासकीय कर्मचारी, अध्यक्षांच्या किंवा यासंबंधात त्यांनी अधिकार प्रदान केलेल्या इतर एखाद्या प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेखेरीज किंवा त्याच्या कर्तव्यांच्या ख-याखु-या अनुपालनाच्या वेळी असेल ते खेरीजकरून, स्वत:च्या नावाने किंवा अन्य व्यक्तीच्या नावाने आकाशवाणी वरील किंवा दूरदर्शनवरील प्रसारित होणा-या कार्यक्रमात सहभागी होणार नाही किंवा वृतपत्राला किंवा नियतकालिकात लेख किंवा पत्र लिहणार नाही;

परंतु, असे प्रसारण किंवा असा सहभाग हा केवळ साहित्यिक, कलात्मक किंवा वैज्ञानिक स्वरूपाचा असल्यास, अशा मंजुरीची आवश्यकता असणार नाही.

६. **<u>मंडळ/शासन यांच्यावर टीका:-</u>** कोणताही कर्मचारी, आकाशवाणीच्या किंवा दूरदर्शनवरील प्रसारणात निनावी किंवा त्याच्या स्वत:च्या नावाने, किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या नावाने प्रसिध्द केलेल्या कोणत्याही लेखात किंवा वृत्तपत्रासाठीच्या कोणत्याही लेखी पत्रकात किंवा कोणत्याही सार्वजनिक भाषणात, पुढील बाबतीत असे कोणतेही वस्तुस्थिती निदर्शक निवेदन करणार नाही मत व्यक्त करणार नाही;

(एक) ज्यामुळे केंद्र सरकार, राज्य शासन, मंडळ किंवा कोणतेही इतर प्रमुख पोर्ट ट्रस्ट यांच्या कोणत्याही चालू किंवा अलीकडच्या धोरणावर किंवा कृतीवर प्रतिकूल टीका होण्याचा परिणाम होईल:

परंतु, या विनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विनियम १ च्या उप-विनियम (३) च्या परंतुकामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कर्मचा-याच्या बाबतीत, अशा कर्मचा-याच्या सेवाशर्ती सुरक्षित करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा त्यामधील कोणत्याही सुधारणा करण्याच्या प्रयोजनार्थ, अशा कर्मचा-याचा श्रमिक संघाचा पदाधिकारी म्हणून त्याने व्यक्त केलेल्या ख-याखु-या मतास लागू होतील किंवा;

(दोन) ज्यामुळे मंडळ, केंद्र सरकार, कोणत्याही राज्याचे शासन, किंवा इतर कोणतेही प्रमुख पोर्ट ट्रस्ट यांच्यातील हितसंबंध अडचणीत टाकण्यास समर्थ असेल;

(तीन) ज्यामुळे केंद्र सरकार आणि कोणत्याही परकीय राज्याचे शासन, यांच्यातील हितसंबंध अडचणीत टाकण्यास समर्थ असेल;

परंतु, या विनियमातील कोणतीही गोष्ट कर्मचा-याने त्याच्या अधिकृत नात्याने किंवा त्याजकडे सोपवण्यात आलेली कर्तव्ये पार पाडताना केलेल्या कोणत्याही निवेदनास किंवा व्यक्त केलेल्या मतास लागू होणार नाही.

## ७. <u>समिती किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणापुढे साक्ष देणे:</u>

(१) उप-विनियम (३) मध्ये करण्यात आलेल्या तरतूदींखेरीज अध्यक्षांच्या पूर्वमान्यतेखेरीज कोणत्याही कर्मचा-याने, कोणत्याही व्यक्तीने, समितीने किंवा प्राधिका-याने केलेल्या कोणत्याही चौकशीच्या संबंधात, साक्ष देणार नाही.

(२) जेव्हा विनियम (१) अन्वये कोणतीही मंजुरी देण्यात आली असेल तेव्हा, कोणताही कर्मचार। अशी साक्ष देताना मंडळाच्या किंवा इतर कोणत्याही प्रमुख पोर्ट ट्रस्टच्या किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या धोरणावर किंवा त्यांच्या कोणत्याही कृतीवर टीका करणार नाही.

(३) या विनियमातील कोणतीही गोष्ट-

(क) केंद्र किंवा राज्य शासन किंवा संसदेने किंवा कोणत्याही राज्य विधान मंडळाने किंवा मंडळाने किंवा इतर कोणत्याही प्रमुख पोर्ट ट्रस्टने नियुक्त केलेल्या प्राधिकरणासमोरील चौकशीस; किंवा

(ख) कोणत्याही न्यायिक चौकशीत दिलेल्या साक्षीस; किंवा

(ग) शासनास दुय्यम असणारे प्राधिकरीने किंवा मंडळाने किंवा इतर कोणत्याही प्रमुख पोर्ट ट्रस्टने किंवा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा विभागप्रमुख यांनी आदेश दिलेल्या कोणत्याही विभागीय चौकशीत दिलेल्या साक्षीस,

लागू होणार नाही.

८. **माहिती अनधिकृतपणे देणे:** कोणताही कर्मचारी, मंडळाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशानुसार किंवा त्याच्यावर सोपाविण्यात आलेल्या कर्तव्यांचे सद्भावपूर्वक पालन करीत असेल ते खेरीजकरून, कोणताही कार्यालयीन दस्तऐवज किंवा माहिती, असा दस्तऐवज किंवा माहिती देण्यास ज्यास प्राधिकृत केले नसेल, अशा कोणत्याही व्यक्तीस, प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे देणार नाही.

**स्पष्टीकरण:** जर एखाद्या कर्मचा-याने आपले अभिवेदन, अपील इत्यादी यांमध्ये जी त्याने सर्वसाधारणपणे ठेवून घेणे अपेक्षित नाही, अशी चिन्हांकित गुपिते, टिप्पण्या व इतर फाईलींमधील माहितीचा ज्यात समावेश असेल अशा मंडळाची किंवा इतर कोणत्याही प्रमुख पोर्ट ट्रस्टची किंवा शासनाची परिपत्रके आणि सूचनां उद्धृत केल्या किंवा त्यांची नक्कल केली तर या कृतीचा अर्थ केवळ अनुचित लावण्यात येणार नाही तर या विनियमाचे उल्लंघन असा ही अर्थ त्यात अंतर्भूत असेल.

९. **अभिदान (वर्गणी):** कोणताही कर्मचारी, अध्यक्षांच्या पूर्वमंजुरी खेरीज, कोणत्याही उद्दिष्टाला अनुलक्षून, कोणताही निधी उभारण्यासाठी वर्गणीची मागणी करणार नाही किंवा ती वर्गणी स्वीकारणार नाही किंवा अन्य रीतीने उपरोक्त प्रयोजनात सहभागी होणार नाही.

**स्पष्टीकरण:** (१) एखाद्या धर्मादाय किंवा लोकहितैषी निधीस केवळ वर्गणी देणे हे या विनियमाचे उल्लंघन होत नाही.

(२) या विनियमान्वये कोणतीही विशिष्ट मंजुरी न घेता माजी सैनिक आणि मर्चंट नेव्हीच्या कर्मचा-यांच्या लाभासाठी ध्वजदिन निधी गोळा करण्यासाठी स्वेच्छेने सहभागी होण्यास कर्मचा-यास परवानगी असेल.

(३) कर्मचा-यांकडून तसेच युनियनच्या इतर सदस्यांमधील कर्मचा-यांच्या सेवासंघांच्या सदस्यांकडून वर्गणी गोळा करणे हे -

(एक) आक्षेपार्ह नसेल आणि पुढील बाबतीत पूर्वमान्यता आवश्यक असणार नाही जर; -

(क) उत्पन्न हे युनियनच्या कल्याण कार्यक्रमांकरिता वापरावयाचे प्रस्तावित केलेले असेल; किंवा

(ख) युनियनच्या सदस्यांच्या सर्वसाधारण हितावर परिणाम करणारी एखादी गोष्ट विवादास्पद असेल तर अशा बाबतीत त्याचा निधी खर्च करण्यास युनियनच्या नियमानुसार मुभा असेल;

(दोन) आक्षेपार्ह असेल जर, अशा एखाद्या व्यक्तीवर, विशेषत: जी कार्यवाही त्याच्याशीच संबंधित असेल अशा एखाद्या कारणावरून विभागीय कार्यवाही करण्यात येण्याचे प्रस्तावित केले असेल अशा, युनियनच्या वैयक्तिक सदस्याच्या संरक्षणासाठी देणगीचा वापर करणे प्रस्तावित केले असल्यास.

(४) अध्यक्षांच्या पूर्वमान्यतेखेरीज युनियनसाठी निधी गोळा करण्याकरिता लोकांकडे जाणे हे आक्षेपार्ह असेल.

[१][१०. **देणग्या:** (१) या विनियमात अन्यथा केलेल्या तरतुदीखेरीज कोणताही कर्मचारी कोणतीही देणगी स्वत: स्वीकारणार नाही किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यास किंवा त्याच्या वतीने काम करणा-या इतर कोणत्याही व्यक्तीला कोणतीही देणगी स्वीकारण्यास परवानगी देणार नाही.

**स्पष्टीकरण:** "देणगी " या संज्ञेत, कर्मचा-याशी कोणताही कार्यालयीन व्यवहार न करणारा जवळचा नातेवाईक किंवा खाजगी मित्र याव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीने देऊ केलेली विनामूल्य वाहतूक, भोजन, निवासव्यवस्था किंवा इतर सेवा किंवा अन्य कोणताही आर्थिक लाभ यांचा समावेश होतो.

**टीप १:** प्रासंगिक भोजन, स्वत:च्या वाहनातून नेणे किंवा इतर सामाजिक कारणाप्रित्यर्थ केलेला पाहुणचार यांना देणगी मानले जाणार नाही.

**टीप २:** कर्मचारी, त्याच्याशी कार्यालयीन व्यवहार असणा-या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा औद्योगिक किंवा वाणिज्यिक संस्था, संघटना इत्यादींकडून मुक्त हस्ताने केलेला पाहुणचार किंवा वारंवार केला जाणारा पाहुणचार स्वीकारण्याचे टाळील.

---

१. २६.४.१९७७ च्या टीआर क्र. १४४ व्दारे आणि एमओएसटी पत्र क्र.पीईबी-३६/७७, दि. १८.७.१९७७ व्दारे दाखल करण्यात आले.(३.११.१९७७ पासून)

(२)(क) विवाह, वर्षदिन, अंत्यसंस्कार किंवा धार्मिक समारंभाच्या वेळी देणग्या देणे हे प्रचलित धार्मिक किंवा सामाजिक रूढीला अनुसरून असते, तेव्हा कर्मचारी त्याच्या जवळच्या नातेवाईकाकडून देणग्या स्वीकारुशकेल पण अशा देणगीचे मूल्य -

(एक) वर्ग 'एक' किंवा वर्ग 'दोनचे' कोणतेही पद धारण करणा-या कर्मचा-याच्या बाबतीत रुपये ५००;

(दोन) वर्ग 'तीन' चे कोणतेही पद धारण करणा-या कर्मचा-याच्या बाबतीत रुपये२५०;

(तीन) वर्ग 'चार' चे कोणतेही पद धारण करणा-या कर्मचा-याच्या बाबतीत रुपये १००;

पेक्षा जास्त असल्यास, तो तसे अध्यक्षाला कळवील.

(ख) उप विनियम (२) च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले आहे अशा प्रसंगी कर्मचारी, त्याच्या शासकीय कामाशी संबंधित नसणा-या त्याच्या वैयक्तिक मित्राकडून देणग्या स्वीकारता येतील, परंतु, अशा कोणत्याही देणगीचे मूल्य, पुढे नमूद केलेल्या मूल्यापेक्षा अधिक असेल तर त्यासंबंधी तो अध्यक्षाला कळवील:-

(एक) वर्ग 'एक' किंवा वर्ग 'दोनचे' कोणतेही पद धारण करणा-या कर्मचा-याच्या बाबतीत रुपये २००;

(दोन) वर्ग 'तीन' चे कोणतेही पद धारण करणा-या कर्मचा-याच्या बाबतीत रुपये १००; आणि

(तीन) वर्ग 'चार' चे कोणतेही पद धारण करणा-या कर्मचा-याच्या बाबतीत रुपये ५०;

(३) इतर कोणत्याही बाबतीत, कर्मचा-याला पुढे नमूद केलेल्या मूल्यापेक्षा अधिक मूल्य असलेली कोणतीही देणगी, अध्यक्षांच्या मंजुरीखेरीज स्वीकारता येणार नाही:-

(एक) वर्ग 'एक' किंवा वर्ग 'दोनचे' कोणतेही पद धारण करणा-या कर्मचा-याच्या बाबतीत रुपये ७५; आणि

(दोन) वर्ग 'तीन' किंवा वर्ग 'चार' चे कोणतेही पद धारण करणा-या कर्मचा-याच्या बाबतीत रुपये २५.]

[1][(४) कोणताही कर्मचारी-

(एक) हुंडा देऊ किंवा घेऊ शकणार नाही किंवा देण्यास किंवा घेण्यास चिथावणी देणार नाहीत; किंवा

---

१. १४.२.१९७६ टीआर क्रमांक ४०८, व्दारे आणि एमओएसटी पत्र क्र. पीईबी-१०४/७६ दिनांक ७.३.१९७७ व्दारे दाखल करण्यात आले (१९.५.१९७७ पासून)

(दोन) वधुकडील किंवा, ययास्थिति, वराकडील मात्यापित्यांकडून किंवा पालकांकडून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही हुंडा मागणार नाही.

**स्पष्टीकरण:** या उप-विनियमाच्या प्रयोजनार्थ 'हुंडा' या शब्दप्रयोगास, 'हुंडाबंदी अधिनियम, १९६१ (१९६१ चा २८) यामध्ये जो अर्थ दिला आहे तोच अर्थ असेल.]

११. **कर्मचा-यांच्या सन्मानार्थ सार्वजनिक समारंभ:**

कोणताही कर्मचारी, अध्यक्षांच्या पूर्वमान्यतेशिवाय, कोणतेही गौरवपर किंवा निरोपाचे मानपत्र घेणार नाही किंवा दाखला स्वीकारणार नाही किंवा त्याच्या किंवा इतर कोणत्याही कर्मचा-याच्या सन्मानाचे भरविण्यात आलेल्या कोणत्याही सभेस किंवा करमणूक कार्यक्रमास हजर रहाणार नाही किंवा नवीन इमारतीं बांधणे त्यांचे उद्घाटन करणे किंवा नवीन इमारतीची कोनशिला बसविणे इत्यादी जाहीर करण्याचे कोणतेही आमंत्रण स्वीकारणार नाही किंवा त्याच्यानंतर एखाद्या सार्वजनिक ठिकाणास किंवा संस्थेस त्याचे नाव देण्याची मुभा देणार नाही:

परंतु, या विनियमातील कोणतीही गोष्ट पुढील बाबतीत लागू होणार नाही -

(एक ) कर्मचा-याच्या किंवा इतर कोणत्याही कर्मचा-याच्या बाबतीत तो सेवानिवृत्त होणार असेल किंवा ज्याची बदली झाली असेल तेव्हा किंवा इतर एखादी व्यक्ती जीने नुकतीच मंडळाची सेवा सोडली असेल अशा व्यक्तीच्या सन्मानार्थ, पूर्णपणे खाजगी व अनौपचारिक स्वरूपाचा निरोप समारंभ; किंवा

(दोन) सार्वजनिक मंडळे किंवा संस्था यांनी आयोजित केलेल्या साध्या व कमी खर्चाच्या अशा मनोरंजनपर कार्यक्रमाची स्वीकृती;

१२. **खाजगी व्यापार किंवा सेवा:** (१) कोणताही कर्मचारी, अध्यक्षांच्या पूर्वमंजुरीखेरीज कोणत्याही व्यापारात किंवा धंद्यात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे गुंतणार नाही किंवा कोणत्याही नोकरीची जबाबदारी स्वीकारणार नाही:

परंतु, कर्मचारी त्याच्या कार्यालयीन कामकाजावर परिणाम होऊ न देण्याच्या शर्तीच्या अधीन राहून अशी मंजुरी मिळाल्याखेरीज, सामाजिक किंवा धर्मादाय स्वरूपाचे एखादे मानसेवी कार्य किंवा साहित्यिक, कलात्मक किंवा शास्त्रीय स्वरूपाचे प्रासंगिक काम हाती घेऊ शकेल. परंतु, जर अध्यक्षांनी तसा निदेश दिला तर तो असे काम हाती घेणार नाही किंवा असे काम करण्याचे बंद करील.

**स्पष्टीकरण:** कर्मचा-याने त्याची पत्नी किंवा त्याच्या कुटुंबातील इतर कोणत्याही सदस्याच्या मालकीच्या किंवा त्याच्या व्यवस्थेखाली असलेल्या विम्याच्या एजन्सी, कमिशन इत्यादीच्या व्यवसायाच्या पुष्टयर्थ, प्रसार करणे हे या उप विनियमाचा भंग असल्याचे मानण्यात येईल.

२. कोणताही कर्मचारी, अध्यक्षांची पूर्व मंजुरी घेतल्याखेरीज कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही बँकेच्या किंवा कंपनीच्या नोंदणीच्या, प्रचालनाच्या किंवा व्यवस्थेच्या कामात भाग घेणार नाही:

परंतु, कर्मचा-याला सहकारी संस्था अधिनियम, १९१२ (१९१२ चा २) अन्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६0 किंवा त्यावेळी अमलात असलेल्या इतर कोणताही कायदा यां अन्वये नोंदणी करण्यात आलेली साहित्यविषयक, वैज्ञानिक किंवा धर्मादाय संस्था यांची नोंदणी, प्रचालन किंवा व्यवस्थापन यांमध्ये भाग घेता येईल.

१३. **पैसे गुंतविणे, उसने देणे आणि उसने घेणे:** (१) कोणताही कर्मचारी कोणत्याही गुंतवणुकीमध्ये पैसे गुंतवणार नाही.

**स्पष्टीकरण:** किंमतीमध्ये वारंवार चढउतार होत असल्याबद्दल प्रसिध्द असलेल्या रोख्यांची सराईतपणे केलेली खरेदी आणि विक्री ही विनियमाच्या अर्थानुसार रकमा गुंतवण्याच्या कामातील सट्टेबाजी म्हणून समजण्यात येईल.

(२) कोणताही कर्मचारी, त्याचे कर्तव्य पार पाडणे अवघड होईल किंवा असे कर्तव्य पार पाडण्यात त्याच्यावर प्रभाव पडण्याचा संभव असेल अशा रीतीने कोणत्याही रकमा गुंतविणार नाही किंवा त्याच्या पत्नीला किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याला तसे करण्यास परवानगी देणार नाही.

(३) जर एखादा रोख किंवा रकमांची गुंतवणुक ही उप-विनियम (१) किंवा उप-विनियम (२) मध्ये निर्देशिलेल्या स्वरूपाची आहे किंवा कसे याबद्दल कोणताही प्रश्न उद्भवला तर तो अध्यक्षाकडे निर्देशित करण्यात येईल व तो त्यावर निर्णय घेईल.

(४) कोणताही कर्मचारी, अध्यक्षांच्या पूर्व मंजुरीने असेल ते खेरीजकरून, त्याच्या प्राधिकाराखालील स्थानिक कक्षांमधील जमीन किंवा किंमती मालमत्ता ताब्यात असणा-या कोणत्याही व्यक्तीस किंवा कोणत्याही व्यक्तीच्या हितार्थ पैसे ऊसने देणार नाही:

परंतु, कर्मचा-याला त्याच्या खाजगी नोकराला वेतनाची आगाऊ रक्कम देता येईल किंवा त्याच्या वैयक्तिक मित्रास किंवा नातेवाईकास, त्याच्या प्राधिकाराच्या स्थानिक कक्षांमध्ये, अशा व्यक्तीच्या ताब्यात जमीन असली तरीही, लहान रकमेचे कर्ज व्याजाशिवाय देता येईल.

(५) कोणताही कर्मचारी प्रतिष्ठित बँक किंवा प्रतिष्ठित व्यावसायिक संस्था यांच्याशी कामकाजाच्या सामान्य ओघात त्याच्या प्राधिकाराखालील स्थानिक हद्दीमधील व्यक्तीला किंवा ज्याच्याशी व्यवहार ठेवण्यासारखा आहे अशा कोणत्याही अन्य व्यक्ती कडून, कर्जाऊ पैसे घेणार नाही किंवा इतर कोणत्याही रीतीने, स्वत:स पैशाबद्दल अशा व्यक्तीस जबाबदार राहणार नाही किंवा आपल्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यास, अध्यक्षाच्या पूर्वमंजुरीने असेल त्या खेरीजकरून, असा कोणताही व्यवहार करण्यास परवानगी देणार नाही.

परंतु, कर्मचा-यास, वैयक्तिक मित्राकडून किंवा नातेवाईकाकडून केवळ तात्पुरत्या स्वरूपाचे बिनव्याजी कर्ज म्हणून अल्पशी रक्कम स्वीकारता येईल किंवा एखाद्या ख-याखु-या व्यापा-याकडे उधारीचे खाते चालू ठेवता येईल.

(६) कर्मचा-याची नेमणूक किंवा बदली उप-विनियम (४) किंवा उप-विनियम (५) यांच्या कोणत्याही तरतुदींचा भंग होण्यामध्ये तो गोवला जाईल अशा स्वरूपाच्या पदावर करण्यात आली असेल तर, तो संबंधित परिस्थितीबाबत ताबडतोब अध्यक्षांना कळवील आणि त्यानंतर अध्यक्ष देईल त्या आदेशानुसार तो कार्यवाही करील.

१४. **<u>नांदारी व नित्याचा कर्जबाजारीपणा:</u>** (१) कर्मचारी, सततचा कर्जबाजारीपणा व नांदारी टाळता येईल अशाप्रकारे त्याचे खाजगी व्यवहारांचे व्यवस्थापन करील. जो कर्मचारी नादारीच्या कायदेशीर कार्यवाहीचा विषय होईल, तो त्याबाबतची संपूर्ण वस्तुस्थिती अध्यक्षांस, ताबडतोब कळवील.

(२) जेव्हा एखाद्या कर्मचा-याविरुध्द जप्तीच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात येत असेल तेव्हा अध्यक्ष-

(एक) कर्मचा-याची आर्थिक स्थिती त्याचा आत्मविश्वास कमी होण्याइतक्या टप्प्यावर पोहोचली होती किंवा कसे हे ठरवील आणि, तसे असल्यास,

(दोन) त्याच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याच्या प्रश्नावर विचार करील.

१५. **<u>स्थावर, जंगम व मौल्यवान मालमत्ता:</u>** (१) कोणताही कर्मचारी, अध्यक्षांला अगोदर कळविल्या शिवाय कोणतीही स्थावर मालमत्ता, एकतर त्याच्या स्वत:च्या नावाने किंवा त्याच्या कुटुंबाच्या कोणत्याही सदस्याच्या नावाने भाडेपट्टयाव्दारे, गहाणाव्दारे, खरेदीव्दारे, विक्रीव्दारे, भेट म्हणून किंवा अन्यथा, संपादित करणार नाही किंवा तिची विल्हेवाट लावणार नाही:

परंतु, असा कोणताही व्यवहार, नेहमीच्या किंवा प्रसिध्द व्यापा-याच्या मार्फत चालविण्यात आला असेल त्याहून अन्य प्रकारे केला असेल तर, त्याला विहित प्राधिका-याची पूर्वमंजुरी आवश्यक असेल.

**स्पष्टीकरण:** कर्मचारी, विहित प्राधिका-याच्या पूर्वमंजुरीशिवाय, जंगम आणि स्थावर मालमत्तेबाबत एखादा व्यवहार करील आणि त्यानंतर त्यास कार्योत्तर मंजुरी मिळवील हे इथे अभिप्रेत नाही. अशी कार्यपध्दती, या विनियमांच्या तरतुदींना पूर्णपणे निष्प्रभावी करते आणि ज्याकरिता हे विनियम तयार करण्यात आला आहे ते प्रयोजनच निष्फळ ठरवते. म्हणून, हे आवश्यक आहे की, या विनियमातील तरतुदींचे कटाक्षाने अनुसरण केले पाहिजे आणि कर्मचारी जेथे जेथे, आवश्यक असेल तेथे, एखादा व्यवहार करण्यापूर्वीच विहित प्राधिकरणाची मंजुरी मिळवील.

(२) जो खरेदी, विक्रीच्या स्थाने किंवा अन्यथा, [१][रुपये १०,०००] पेक्षा अधिक मूल्याच्या कोणत्याही जंगम मालमत्ते संबंधात कोणताही व्यवहार करील तो कर्मचारी, तो अध्यक्षाला अशा व्यवहाराबाबत तात्काळ कळवील:-

परंतु, कोणताही कर्मचारी असा कोणताही व्यवहार, अध्यक्षाच्या पूर्वमंजुरीखेरीज, एखाद्या नेहमीच्या किंवा प्रसिध्द व्यापा-याच्या किंवा अभिकर्त्याच्या बरोबर किंवा मार्फत करणार नाही.

**स्पष्टीकरण:** या उप-विनियमाच्या प्रयोजनार्थ, "जंगम मालमत्ता" या शब्दप्रयोगात, इतर गोष्टींबरोबरच पुढील मालमत्तेचा समावेश आहे;

[२][ (क) जडजवाहीर, ज्यांचा वार्षिक हप्ता [१] [रुपये १०,०००] हून अधिक आहे अशा विमापत्रांची रक्कम किंवा मंडळाकडून मिळालेल्या एकूण वार्षिक वित्तलब्धीच्या एक-षष्ठांश रक्कम, यांपैकी जी कमी असेल ती रक्कम शेअर, रोखे आणि ऋणपत्रे;]

(ख) अशा कर्मचा-यांनी काढलेली कर्जे, मग ती प्रतिभूती मिळवलेली असोत किंवा नसोत;

(ग) मोटारगाडया, मोटारसायकली, घोडे किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे वाहन; आणि

(घ) शीतपेटी (रेफ्रिजरेटर), रेडिओ, रेडिओग्राम व दूरचित्रवाणी संच,
यांचा समावेश होतो.

---

१. दिनांक ९.८.१९८८ च्या टीआर क्र.२१४ व्दारे आणि एमओएसटी पत्र क्र. पी आर १२०१३/१९/८८ पीई-१, दिनांक २/५.१२.१९८८ व्दारे सुधारित.

२. १४.१२.१९७६ च्या टीआर क्रमांक ४०८ आणि एमओएसटी पत्र क्र.पीईबी-१०४/७६ दिनांक ७.३.१९७७ व्दारे दाखल करण्यात आले (१९.५.१९७७ पासून)

(३) वर्ग एक आणि वर्ग दोन मधील प्रत्येक कर्मचारी, मंडाळाच्या सेवेत त्याचा प्रवेश झाल्यानंतर आणि त्यानंतर प्रत्येक बारा महिन्यांच्या मध्यांतराने एकतर त्याच्या स्वत:च्या नावाने किंवा त्याच्या कोणत्याही कुटुंबियाच्या नावाने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या नावाने त्याच्या मालकीच्या किंवा त्याने संपादित केलेल्या किंवा त्याला वारसा म्हणून प्राप्त झालेल्या सर्व स्थावर मालमत्तेचा तपशीलाचे विवरण या विनियमास जोडलेल्या जोडपत्र 'अ' मध्ये विहित केलेल्या नमुन्यात सादर करील.

(४) अध्यक्ष, कोणत्याही वेळी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाव्दारे, कर्मचा-यास, आदेशामध्ये विनिर्दिष्ट केले असेल अशा कालावधीत, त्याने किंवा त्याच्या वतीने किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने धारण केलेल्या किंवा संपादित केलेल्या अशा स्थावर किंवा जंगम मालमत्तेचे पूर्ण व परिपूर्ण विवरण आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, सादर करण्यास भाग पाडू शकेल: अशा विवरणपत्रामध्ये, अध्यक्षाने आवश्यक केले असल्यास ज्या साधनांव्दारे किंवा मार्गाने अशी मालमत्ता संपादित केली होती, त्याचा तपशिलाचा समावेश असेल.

**स्पष्टीकरण:** (१) घराचे बांधकाम करणे याची परिणती स्थावर मालमत्ता संपादित करण्यात होते. आणि या विनियमाच्या तरतुदींमध्ये समाविष्ट होते. घराच्या बांधकामाकरिता स्थावर जंगम मालमत्तेची खरेदी करणे हे ही या विनियमात येते.

(२) हिंदू अविभक्त संयुक्त कुटुंबाचा सदस्य म्हणून केलेल्या व्यवहारासाठी अध्यक्षांची पूर्वपरवानगी आवश्यक असणार नाही. अशा प्रकरणात स्थावर मालमत्तेच्या वार्षिक मालमत्तेत विवरणात सामावेश करण्यात येईल आणि ती जंगम मालमत्तेत येईल त्याबाबत व्यवहार पूर्ण झाल्यावर किंवा त्याबाबत कर्मचा-यास माहिती झाल्यानंतर, तात्काळ, विहित प्राधिकरणास कळविण्यात येईल.

कर्मचारी अशा मालमत्तेमधील त्याच्या वाटयाबाबत कोणतीही कल्पना देण्यात अयशस्वी ठरल्यास, तो संपूर्ण मालमत्ता व त्यात ज्यांचा हिस्सा आहे त्यांची नावे यांचा सविस्तर तपशील देईल.

१६. **कर्मचा-याच्या कृतीचे आणि वर्तणुकीचे प्रतिसमर्थन:** कोणताही कर्मचारी, अध्यक्षांच्या पूर्वमंजुरीशिवाय, जी प्रतिकूल टीकेचा किंवा अब्रुनुकसानीच्या स्वरूपाच्या आरोपाचा विषय झाली असेल अशा कोणत्याही अधिकृत कृतीच्या प्रतिसमर्थनार्थ, कोणत्याही न्यायालयाचा किंवा वृत्तपत्रांचा अवलंब करणार नाही.

**स्पष्टीकरण:** या विनियमातील कोणत्याही मजकुरामुळे, कर्मचा-याला, त्याच्या खाजगी चारित्र्याचे किंवा त्याने खाजगी स्वरूपात केलेल्या कृतीचे समर्थन करण्यास प्रतिबंध होतो, असे समजता कामा नये.

१७. **अशासकीय किंवा इतर बाह्य प्रभावांचा प्रचार करणे:** कोणताही कर्मचारी, मंडळाच्या अधीन त्याच्या सेवेच्या बाबीच्या संबंधात त्याचा पुढील हितसंबंध जपण्यासाठी, त्याच्या कोणत्याही वरिष्ठ प्राधिका-यावर कोणताही राजकीय किंवा इतर दबाब आणणार नाही किंवा आणण्याचा प्रयत्न करणार नाही.

१८. **विवाहसंबंधी निर्बंध:-** (१) कोणताही कर्मचारी, या विनियमाच्या प्रारंभानंतर-

(क) ज्याचा जीवनसाथी हयात आहे अशा कोणत्याही व्यक्तीशी विवाह करणार नाही किंवा विवाहविषयक करार करणार नाही;

(ख) त्याचा जीवनसाथी जीवित असताना, कोणत्याही व्यक्तीशी विवाह करणार नाही किंवा विवाहविषयक करार करणार नाही:

परंतु, अध्यक्ष या विनियमाच्या जोडपत्र 'ब' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात अर्ज केल्यावर, जर त्यांची अशी खात्री पटली की -

(क) असा विवाह हा अशा कर्मचा-याला आणि विवाहातील दुस-या पक्षाला लागू असणा-या व्यक्तिगत कायद्यानुसार संमत आहे; आणि

(ख) तसे करण्यास इतरही कारणे आहेत असे असेल तर, अशा कर्मचा-याला या विनियमाच्या कार्यवाहीपासून सूट देऊ शकेल.

(२) हे विनियम अंमलात आल्यानंतर मंडळाच्या सेवेत दाखल होणारी प्रत्येक व्यक्ती, अशा प्रवेशापूर्वी, या विनियमाच्या जोडपत्र 'ग' मध्ये घालून दिल्याप्रमाणे तसे प्रतिज्ञापन देईल.

[1][१८अ. **कर्मचा-यांनी छोटया कुटुंबाचा अंगिकार करणे:** प्रत्येक कर्मचारी त्याच्या मुलांची संख्या तीनपेक्षा अधिक असणार नाही याची सुनिश्चिती करील.

परंतु, या विनियमातील कोणतीही गोष्ट, १ जानेवारी, १९७८ रोजी ज्या कर्मचा-यांना तीन मुले आहेत अशा कर्मचा-यांना लागू होणार नाही.

परंतु, आणखी असे की, पूर्ववर्ती परिच्छेदांमध्ये निर्देश केलेला कर्मचारी, त्या दिनांकास त्याच्या मुलांची जी संख्या होती, त्या मुलांच्या संख्येत नंतर वाढ होणार नाही, याची सुनिश्चिती करील.]

---

१. १४.१२.१९७६ च्या टीआर क्रमांक ४०८, व्दारे आणि एमओएसटी पत्र क्र.पीईबी-१०४/७६ दिनांक ७.३.१९७७ व्दारे समाविष्ट केले (१९.५.१९७७ पासून)

१९. **मद्यपान:** कोणत्याही क्षेत्रात अंमलात असलेल्या मादक द्रव्य किंवा औषधिद्रव्ये यांच्या संबंधातील तात्पुरत्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना अधीन राहून, कोणताही कर्मचारी -

[१][(क) त्याच्या कर्तव्याच्या कालावधीत, कोणत्याही अंमली द्रव्याच्या किंवा औषधिद्रव्याच्या प्रभावाखाली असणार नाही; किंवा]

(ख) मद्यपान केलेल्या स्थितीत एखाद्या सार्वजनिक ठिकाणी उपस्थित राहणार नाही;

(ग) नेहमीच अशा पेयाचे किंवा द्रव्याचे प्रमाणाबाहेर नित्यसेवन करणार नाही.

२०. **अर्थउकल:** या विनियमांच्या अर्थविवरणाबद्दल कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, तो, [२][केंद्र सरकारकडे] निर्दिष्ट करण्यात येईल व त्यावर केंद्र सरकार निर्णय घेईल.

---

१. २५.९.१९७९ चा टीआर क्र.३२७ व एमओएसटी अधिसूचना क्र.पीईबी- ५/८०, दि. २६.३.१९८० व्दारे दाखल केले. (५.४.१९८० पासून)

२. ११.१०.१९७७ चा टीआर क्रमांक ३०८ आणि एमओएसटी पत्र क्र.पीईबी-९४/७६, दि.२१.२.१९७८ द्वारे दाखल करण्यात आले. (४.३.१९७८ पासून)

## जोडपत्र 'अ'

## [विनियम १५ (३) पहा]

सन_____ या वर्षाचे, प्रथम नियुक्ती झाल्यावर स्थावर मालमत्तेचे विवरण

१. कर्मचा-याचे (संपूर्ण)
नाव_____

२. सध्या धारण करीत असलेले
पद_____

३. विद्यमान वेतन_____

| जिथे मालमत्ता स्थित आहे असा जिल्हा, उप-विभाग, तालुका यांचे नाव | मालमत्तेचे नाव व सविस्तर तपशील | | सध्याचे मूल्य* | जर राज्यात त्याच्या स्वतःच्या नावावर घर नसल्यास, ज्याच्या नावावर असेल त्याचे नाव आणि कर्मचा-याचे त्याच्याशी/ तिच्याशी असलेले नाते. @ | कशाप्रकारे संपादित केली आहे ते, म्हणजे खरेदी, भाडेपट्टयाने+ तारण म्हणून, वारसा हक्काने, भेट किंवा अन्यथा, संपादित केल्याचा दिनांक आणि ज्या कोणा व्यक्तीकडून ती संपादित केली आहे तिचे नाव यासह तपशील. | मालमत्तेतून मिळणारे वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| | घर व इतर इमारती | जमीन | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

टीप: प्रत्येक अधिका-याने मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (वर्तणूक) विनियम, १९७६ च्या विनियम १५ च्या पोट-कलम ३ अन्वये या प्रतिज्ञापनाचा नमुना त्याची सेवेत प्रथम नियुक्ती झाल्यानंतर, आणि त्यानंतर प्रत्येक बारा महिन्यांच्या कालांतराने, एकतर त्याच्या स्वत:च्या नावाने किंवा त्याच्या कुटंबातील कोणाही सदस्याच्या नावाने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या नावाने त्यास वारस म्हणून प्राप्त झालेली किंवा त्याच्या मालकीची किंवा त्याने संपादित केलेली किंवा भाडेपट्टयाने

किंवा गहाण म्हणून धारण केलेल्या सर्व स्थावर मालमत्तेचा तपशील देऊन भरणे आणि सादर करणे आवश्यक आहे.

* जर, एखाद्या प्रकरणात अचूक मूल्य निर्धारित करणे शक्य झाले नाही, तर सध्याच्या स्थितीतील त्याचे अंदाजित मूल्य दर्शविण्यात येईल.

@ लागू नसेल ते खोडावे.

\+ यात अल्प-मुदतीच्या भाडेपट्टयाचाही समावेश आहे.

स्वाक्षरी_____

दिनांक_____

## जोडपत्र 'ब'

## [विनियम १८(१) आणि जोडपत्र 'क' पहा]

विनियम १८ खालील आवश्यक परवानगी मिळण्यासाठी अर्ज

प्रति

_____

_____

_____

महोदय,

मी अशी विनंती करतो की, खाली नमूद केलेली कारणे लक्षात घेता, मला मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (वर्तणूक) विनियम, १९७६ याच्या विनियम १८ च्या कार्यवाहीतून सूट देण्यात यावी.

**कारणे**

(इथे कारणे लिहावीत)

आपला विश्वासू

_____

(स्वाक्षरी)

दिनांक_____

# जोडपत्र "क"

## [विनियम १८(२) पहा]

## प्रतिज्ञापन

1. मी ,
श्री/श्रीमती/कुमारी_____
खालीलप्रमाणे जाहीर करतो/करते की:

*(एक) मी अविवाहित /विधुर/विधवा आहे;

*(दोन) मी विवाहित आहे आणि माझी फक्त एकच पत्नी हयात आहे;

*(तीन) मी विवाहित आहे आणि माझ्या एकापेक्षा अधिक पत्नी जीवित आहेत: मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (वर्तणूक) विनियम, १९७६ च्या जोडपत्र 'ख' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यातील अर्ज, सूट मिळण्यासाठी, सोबत जोडला आहे;

*(चार) मी विवाहित आहे आणि माझा विवाहसाथी हयात असताना, मी दुसरा विवाहाचा करार केलेला आहे. मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (वर्तणूक) विनियम, १९७६ याच्या जोडपत्र 'ख' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यातील अर्ज, सूट मिळण्यासाठी, सोबत जोडला आहे;

***(पाच) मी विवाहित आहे आणि माझ्या माहितीप्रमाणे माझ्या पतीची इतर कोणी हयात पत्नी नाही***

*(सहा) मी अशा व्यक्तीशी विवाह केला आहे की जिच्या, आधीचीच, एक किंवा अधिक पत्नी हयात आहेत. मुंबई पोर्ट ट्रस्ट कर्मचारी (वर्तणूक) विनियम, १९७६ याच्या जोडपत्र 'ख' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यातील अर्ज, सूट मिळण्यासाठी, सोबत जोडला आहे;

@२ मी गांभीर्यपूर्वक असे कथन करतो/करते की वरील प्रतिज्ञापन सत्य आहे आणि मला हे माहित आहे की, प्रतिज्ञापनाच्या वेळी, अर्ज केल्यानंतर ही माहिती असत्य असल्याचे आढळून आल्यास, मी सेवेतून बडतर्फ केला/केली जाण्यास पात्र असेन.

दिनांक_____ स्वाक्षरी_____

* कृपया लागू नसतील ते खंड वगळावेत.

@ फक्त खंड (एक), (दोन) आणि (तीन) यांच्या बाबतीत लागू

[ फाईल क्रमांक पीईबी/६/७५ दिनांक २८ मे १९७६.]